# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १२४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०२/२०१७

**१) अज्ञात आटो चालकांच्या निष्काळजीपणामुळे, दोन जखमी . :–**

दिनांक १९/०२/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील फिर्यादी दम्मपीक रुपचंद राऊत वय २६ वर्ष, रा. गडेगाव हा व त्याचा मित्र हेमकृष्ण योगराज बावने वय ३५ रा. पींडकेपार याची मोटार सायकल क्र. एमएच ३१ एडब्लु ३०७० वर मागे बसुन येत असतांना साकोली कडुन पींडकेपार कडे येणाऱ्या यातील अज्ञात आरोपी आटो चालाकने आपल्या ताब्यातील आटो भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन मोटार सायकल ला धडक मारल्याने फिर्यादीचे उजव्या पायाला व त्याचे मित्राचे उजव्या पायाला मार लागुन जखमी करण्यास कारणभुत झाल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३८ भांदवी. सहकलम १३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे

**२) तलावाचे पाण्यात बुडुन मृत्यु . :–**

दिंनाक २७/०९/२०१६चे ०९/३० ते १८/०२/२०१७ रोजी १९.०० वा. दरम्यान यातील मृतक श्रीमती जिराबाई उर्फ नामदेव सिरसागर वय ७० वर्ष, रा. सुंदरी ही गुम झाली होती त्यासंबधाने पोस्टे साकोली येथे दिनांक २८/०९/२०१६ ला गुम संबधाने गुम रजीस्टरवर नोंद असुन दिनांक १८/०२/०१७ चे १९.०० वा. दर. मृतक ही परसोडी तलावाचे सरात मृत अवस्थेत हाडाचा सांगाडा अशा स्थितीत आढळुन आली मृत हि दि. २७/०९/०१६ चे १९.३० वा. दर. अंगात घालुन गेलेल्या कपडया वरून फिर्यादीला त्याची आई असल्याचे कपडयावरून खात्री पटल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो. स्टे. साकोली हे करीत आहे.

**३) मासोळी पकडण्यास गेला असतांना नदीचे पाण्यात बुडुन मृत्यु . :–**

दिंनाक १९/०२/२०१७ रोजी १५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी व त्याचा चुलत भाउ मृतक राधेशाम उदलजी खंगार वय २५ वर्ष रा. पाचगाव हे दोघेही सुर नदीचे पात्रात मासोळी पकडण्यास गेले असतांना मृतक हा मासोळी पकडण्याकरिता नदीचे खोल पात्रातील पाण्यात जावुन पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी राजकुमार सुर्यभान खंगार वय ३४ वर्ष, रा. पाचगाव यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे १७४ कलम जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. श्रीरामे पो.स्टे. वरठी हे करीत आहे.

**४) शिवजयंती रॅली मध्ये गुन्हा करण्याच्या उददेशाने चाकु मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/०२/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान. यातील आरोपी हा शिवजयंती रॅली मध्ये गुन्हा करण्याच्या उददेशाने स्वत: जवळ १ लोखंडी चाकु अंदाजे किं २००/–रू. चा बाळगुन मिळुन आल्याने व मा. जिल्हाधिकारी भंडारा यांचे कलम ३७ (१) (३) मपोका आदेशाचे उल्लंघन करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे पोना वाल्दे पो.स्टे. जवाहरनगर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४,२५ शस्त्र अधिनीयम १९५९ सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आळे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-

दिनांक १९/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ७४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.